Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# महात्मा गांधी : एक शिक्षण प्रवास

डॉ. प्रकाश कांबळे.
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती सुशिलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

परिचय :


महापुरूषांचा शोध हा क्षितीजाच्या शोधासारखा असतो. प्रत्येक महापुरूष हा दिसतो, कळतो त्यापेक्षा कितीतरी महान असतो. अखिल मानवतेला वेगळे काही सांगण्याचा, देण्याचा व संस्कृतीला नवी दिशा देण्याचा ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केला त्यामध्ये महात्मा गांधींचा निश्चितच समावेश करावा लागेल. महात्मा गांधी म्हणजे भारतीय जीवनातील परंपरांचे, तात्त्विकतेचे व नैतिकतेचे सारच होय. त्यांना भारतात राष्ट्रपिता म्हणून संबोधले जाते. भारत पारतंत्र्यात रखडलेला असताना त्यास स्वतंत्र करण्याचा महात्मा गांधींनी विडा उचलला होता. यासाठी अहिंसक मार्गाचा त्यांनी अवलंब केला. भारतीय जनतेत त्यांनी आत्मविश्वास निर्माण केला. साधी राहणी व उच्च विचारसरणी या न्यायाने त्यांनी आपले जीवन व्यतीत केले. त्यांनी आपले जीवन हा एक प्रयोग आहे असे समजले आणि त्यामुळे ते सतत प्रवाही राहिले. राजकीय क्षेत्रात काम करतांना शिक्षण क्षेत्रात त्यांनी आपले शैक्षणिक विचार मांडले, त्यांनी आपली स्वतंत्र शिक्षण पध्दती सुचविली. सत्यशोधन हा जगातील सर्वच क्षेत्रातील थोर विभूतींचा व प्रतिभावंतांचा जीवनध्यास होता, जीवनध्येय होते. सत्यावर गांधीजींची गाढ श्रध्दा होती. पूर्वी ते ळवक पे जतनजी असे म्हणत मात्र नंतर ते ज्तनजी पे ळवक असे म्हणू लागले. देवावर विश्वास न ठेवणारी माणसे खूप आढळतील, पण सत्यावर विश्वास नाही असे म्हणणारा एक माणूस शोधूनही सापडणार नाही. गांधीजींच्या मते केवळ असत्याचा अभाव म्हणजे सत्य नव्हे. सत्याचा मार्ग नेहमी सरळ आणि संक्षिप्त असतो. कोणत्याही प्रकारचे आडवळण, आडपडदा, तिरकसपणा, विपर्यास, अतिशयोक्ती सत्याला मान्य नसतात. गांधीजींचा जन्म ०२ ऑक्टोबर १८६९ रोजी काठियावाड येथील पोरबंदर येथे झाला. त्यांचे मूळ नाव मोहनदास आणि वडिलांचे नाव करमचंद गांधी होते. वडील गुजरातमधील राजकोट संस्थानचे दिवाण होते. गांधीजींवर त्यांच्या आईचा खूप प्रभाव पडला होता त्यामुळे ते आदर्शवादी बनले होते.

इ.स. १८८७ मध्ये गांधीजींनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे कायदयाचे शिक्षण घेण्यासाठी ४ सप्टेंबर १८८७ रोजी परदेशात गेले. इ.स. १८९१ मध्ये बार अॅट लॉ करून ते भारतात आले. त्यांनी राजकोट येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. एका खटल्यामध्ये त्यांना दक्षिण आफ्रिकेत जावे लागले. तिथे भारतीयांना योग्य वागणूक मिळत नसे. त्यामुळे त्यांच्या जीवनाला एक कलाटणी मिळाली. तेथे काळे गोरे असा भेदभाव चालू होता. याची जनजागृती करण्यासाठी एक इंडियन ओपिनियन नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. त्यांनी दक्षिण आफ्रिकेत २१ वर्षे वास्तव्य केले. त्यानंतर ते १९१४ साली भारतात परत आले. गांधीजींनी काही ग्रंथांची निर्मिती केली. अॅन आॅटोबायाग्राफी किंवा एक्स्पीरियन्स वीथ ट्रुथ, हिंद स्वराज व सत्याग्रह आश्रमाचा इतिहास हे तीन ग्रंथ आहेत.

गांधीजींचे शैक्षणिक विचार :

महात्मा गांधीजींनी आपले शैक्षणिक विचार इ. स. १९०८ मध्ये हिंद स्वराज या ग्रंथामध्ये सविस्तर मांडले आहेत. १९३७ मध्ये वर्धा येथे एक सभा बोलाविली होती. त्या सभेत त्यांनी नई तालिम, बुनियादी शिक्षा, मूलोदयोगी शिक्षण (ठेंपब म्कनबंजपवद) याचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते साक्षरता म्हणजे शिक्षण म्हणता येणार नाही, शिक्षणाची

सुरूवात पण नाही तर माणसाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अंगामधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण होय. स्वावलंबन, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा या त्रिसुत्रीवर त्यांनी आपली योजना तयार केली. मूलोदयोगी शिक्षण ही योजना वर्धा शिक्षण योजना, बुनियादी शिक्षण योजना व मूलोदयोगी शिक्षण योजना या नावाने परिचित आहेत्र या योजनेची वैशिष्टे म्हणजेच महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार आहेत.




मुलांना मातृभाषेतूनच शिक्षण दिले पाहिजे त्यामुळे विषय समजण्यास सोपे जाते. मातृभाषेमुळे बालकात सर्जनशीलता विकसित होते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने ग्रहण शक्तीचा विकास होतो. ७ ते १४ वर्षे या वयोगटातील मुलामुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण करावे. बहुजन समाजातील मुलामुलींच्या घरची परिस्थिती गरीब असल्याकारणाने मोफत शिक्षण दिले तर त्याचा फायदा सदर मुलामुलींना घेता येईल. शिक्षण घेण्याचा सर्वांना समान अधिकार आहे. जाती, धर्म, पंथ, लिंग यानुसार भेदभाव न करता सर्वांना शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. सर्व विषय हे हस्तकलेच्या माध्यमातून शिकवावेत असे गांधीजींना वाटत होते. शिक्षण हस्तकला केंद्रीत व्हावे असे त्यांना वाटत होते. या हस्तकेलेतून शिक्षणाचा जीवनाशी संबंध जोडला जाईल व या शिक्षणातून मुलामुलींच्या मानसिक शक्तीच्या विकासास चालना मिळेल असे त्यांना वाटे. विदयार्थी शाळेत शिकत असताना त्यांनी निरनिराळया वस्तू बनवाव्यात व त्या बाजारात विकाव्यात. त्यामधून त्यांची पैशाची गरज भागेल आणि यातूनच ते आत्मनिर्भर होतील यासाठी गांधीजींनी मूलोदयोगी शिक्षणात स्वावलंबनास प्रमुख स्थान दिले.


एखादा विषय शिकवताना तो विषय स्वतंत्र नसून त्याचा संबंध जीवनाशी आणि इतर विषयांशी असतो हे पटवून देणे म्हणजे समवाय होय. सामाजिक विषयाचे अध्ययन करताना मातृभाषेतील शब्दांचे उच्चार करणे म्हणजे प्रत्यक्ष समवाय साधणे होय. समवायाचा आधार हस्तकला असल्याने स्थानिक वातावरणात अशा विषयांची निवड करावी. मूलोदयोगी शिक्षण मानसशास्त्रीय सिध्दांतावर आधारित आहे. ज्या विदयार्थ्यांना शिकवायचे आहे त्याच्या शरीराचे व मनाचे शिक्षकाला ज्ञान असणे आवश्यक आहे. म्हणून शिक्षण हे विदयार्थ्यांना शारीरिक शक्ती व मानसिक प्रवृत्तीच्या संदर्भात दिले पाहिजे. विविध वस्तू व उपकरणांचा स्वतःच्या हाताने वापर केल्याने विदयार्थ्यांची निरीक्षण शक्ती विकसित होते. महात्मा गांधीजींनी मूलोदयोगी शिक्षण पध्दती भारतात लागू करण्यासाठी व तिचे स्वरूप कशा प्रकारे असेल यासाठी वर्धा येथे १९३७ मध्ये एक परिषद बोलाविली होती. या परिषदेचे अध्यक्ष डॉ.झाकिर हुसेन हे होते. या परिषदेमध्ये एक शिक्षण योजना आखण्यात आली. या योजनेसच मूलोदयोगी शिक्षण योजना असे म्हणतात.

महात्मा गांधीजींच्या मतानुसार शिक्षणाची ध्येये :




चारित्र्याची जडणघडण ही शिक्षणातून केली जाते. चारित्र्याची घडण म्हणजे विविध गुणांची जोपासना करणे व ते गुण विदयार्थ्यांत संक्रमित करणे होय. जर शिक्षणाने चारित्र्याची जडणघडण होत नसेल तर ते शिक्षण कुचकामी ठरते. चारित्र्यामध्ये संयम, सदाचार, सत्याग्रह, सदगुण, सहिष्णुता, स्वावलंबन, आत्मनिर्भरता इ. गुणांचा समावेश होतो. शिक्षणातून विदयार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौदिधक व भावनिक विकास झाला पाहिजे. शिकणे, लिहिणे व गणित

याऐवजी बुध्दी, भावना व हाताच्या विकासाकडे विशेष लक्ष गांधीजींनी दिले होते. मुक्त करते ते शिक्षण अशी त्यांची धारणा होती. आध्यात्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाल्यास ईश्वराचे ज्ञान व आत्मानुभूती प्राप्त होऊ शकते. शिक्षणाचा अर्थ केवळ बालकाच्या डोक्यात ज्ञान कोंबणे नव्हे तर सर्व इंद्रियांचा वापर करणे हा आहे. प्रत्यक्ष कृतीने बालकास जे ज्ञान व अनुभव मिळतो त्यास खरे शिक्षण म्हणता येईल. स्वत:च्या पायावर उभे राहून स्वत:च्या कुटुंबाचे पालन पोषण करण्याची क्षमता बालकात शिक्षणाच्या माध्यमातून आली पाहिजे. बालकांना व्यावसायिक शिक्षण दिल्यास अर्थोत्पादन करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण होईल. सांस्कृतिक वारसा पुढील पिढीकडे संक्रमित करणे हे देखील शिक्षणाचे ध्येय आहे. ज्या शिक्षणातून आपल्या संस्कृतीचा आविष्कार होईल असे शिक्षण बालकांना दिले पाहिजे या मताचे गांधीजी होते. वादविवाद, चर्चासत्रे, श्रमदान, ग्रामसफाई अशा कार्यक्रमादवारे सांस्कृतिक शिक्षण देता येते. माणूस समाजशील प्राणी आहे. समाजात राहूनच तो आपले कार्य करीत असतो म्हणून समाजाशिवाय माणसाची प्रगती व व्यक्ती विकासाशिवाय समाजाची आणि राष्ट्राची प्रगती होऊ शकत नाही. यासाठी बालकांत जबाबदारीची जाणीव शिक्षणाने निर्माण केली पाहिजे. गांधीजींनी बालकाच्या शिक्षणासाठी अध्ययन अध्यापन पध्दती सुचविली आहे. शिक्षक अनुभवी असल्यास त्यांच्या स्वानुभवातून शिक्षण दयावे. बालके आणि शिक्षक हे एकत्र असतील तेव्हा बालकांशी विषयानुरूप चर्चा करावी.




महात्मा गांधींनी जनतेला एक मौलिक शिक्षण पध्दतीची भेट दिली ती म्हणजे मूलोदयोगी शिक्षण पध्दती. त्यांच्या शैक्षणिक विचारात प्रामुख्याने भारतीय आध्यात्मवाद, निसर्गवाद आणि कार्यवाद यांचा त्रिवेणी संगम झालेला आहे. अगदी सुरूवातीच्या काळात गांधीजींची वेशभूषा थाटामाटाची होती. पण आपल्या देशबांधवांचे जीवन जवळून पाहिल्यानंतर त्यांच्यात वैचारिक परिवर्तन झाले. त्यांनी खादीचा पुरस्कार केला. पुढेपुढे तर त्यांनी केवळ पंचाच वापरला. ते स्वत: बॅरिस्टर होते पण त्यांच्या राहणीमानात एकदम साधेपणा होता. त्यांचे मोठेपण हे त्यांच्या साधेपणात होते. त्यांनी आपल्या मनाचा निष्पापपणा आयुष्यभर जपला. अगदी लहानपणी त्यांच्या गावी एका नाटक कंपनीने अयोध्येचा राजा हरिश्चंद्र हे नाटक केले. हे नाटक त्यांच्या जीवनावर खूप मोठा प्रभाव टाकून गेले. सत्यासाठी हालअपेष्टा सोसणारा व कायदयाचे पालन करण्यासाठी आपल्या पत्नीवर वार करायला तयार झालेला हरिश्चंद्र त्यांना खूपच भावला. त्याच्यासारखी सत्यवादी भूमिका त्यांनी आयुष्यभर वटवली. गातेतील तत्वज्ञानाचाही त्यांच्यावर असाच प्रभाव पडला. केवळ काम आणि काम करीत जाणे एवढेच त्यांना माहीत होते. त्यांनी मानवतेसाठी जे जे केले ते न्याय भावनेतून, कर्तव्य भावनेतून आणि निरपेक्ष सेवाभावातून. त्यांना शिक्षणातून माणूस घडवायचा होता, शिक्षणातून त्यांना मुलांचे चारित्र्य घडवायचे होते यासाठी त्यांनी परिश्रम घेतले. सर्वांगीण विकासाचे तत्व अंमलात आणून कृतिदवारे शिक्षण दयावे याचा त्यांनी पुरस्कार केला. बालकाच्या स्वानुभवातून शिक्षण दिल्यास शिक्षणातून समवाय साधता येतो यावर त्यांचा भर होता. धार्मिक, नैतिक कला व भाषा शिक्षण यामध्ये त्यांचे विचार मोलाचे आहेत. त्यांनी शिक्षणाच्या व जीवनाच्या आवश्यक गरजा यांचा संबंध जोडला आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात सत्य आणि अहिंसा यांना फार मोठे स्थान दिले. त्यांची अहिंसेची कल्पना फार व्यापक होती. केवळ शब्दांनी एखादयाला दुखावणे ही देखील एक हिंसाच आहे असे त्यांना वाटे. अहिंसेचा अर्थ असा की, आपले मन आणि आत्मा शुध्द असला पाहिजे. अहिंसा म्हणजे सर्वोदय. जीवनातील अशुभावर प्रेमाने विजय मिळविणे म्हणजे अहिंसेचा मार्ग अंगिकारणे होय. गांधीजी एक मूल म्हणून या जगात प्रवेशले, मोहनदास म्हणून वावरले, एक माणूस म्हणून जगले आणि महात्मा म्हणून या जगातून निघून गेले. अशा या महान विभूतीचा या आपल्याच देशातल्या माणसाने खून केला पण त्यांचे विचार अमर झाले.

VOL- VIII ISSUE- VII JULY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

संदर्भ :

1. डॉ.के.यु.घोरमोडे, डॉ.कला घोरमोडे, शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य (२००६), नागपूर, विदया प्रकाशन.
2. प्राचार्य रा.तु.भगत, प्रा.आ.ल.माळी, थोर शिक्षणतज्ज्ञ, पुणे, गो.य.राणे प्रकाशन.
3. प्रा.ना.ग.पवार, शिक्षणक्षेत्रातील विचारवंत, पुणे, नुतन प्रकाशन.
4. डॉ.सहदेव चौगुले–शिंदे, पाथेय भाग १(२०१२), कोल्हापूर, रिया पब्लिकेशन.